# मिरा भाईंदर महानगरपालिका


**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र./176/2024-25 दि. 20/09/2024

## // परिपत्रक //

**विषय :- २८ सप्टेंबर हा दिवस "आंतराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्र.केमाअ२००८/प्र.क्र.३७८/०८/सहा,सामान्य प्रशासन विभाग दि. २० सप्टेंबर, २००८.**

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा देशभरात दि.12/10/2005 पासून लागू करण्यात आला आहे. शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरुपात लोकाभिमुख झाला आहे. महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन स्तरावरुन सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. दिनांक 28 सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपध्दती, विविध दृकश्राव्य माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देवून व विविध उपक्रम राबवून, त्या जास्तीतजास्त नागरिकांपर्यत पाहोचविण्याचा शासनाचा मानस आहे. यास्तव प्रतिवर्षी 28 सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

दिनांक 28 सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. या दिवशी शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीचा अधिकार या विषयावर आधारित प्रश्नमंजूषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व इ. सारख्या स्पर्धा तसेच चर्चासत्र व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. तसेच समाजसेवी संस्थांच्या मदतीने समाज कार्यकर्त्याकरिता व इच्छुक गटांकरिता भित्तीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इ. उपक्रम आयोजित करावेत. या उपक्रमांसाठीच्या पारितोषिकांची व्यवस्था स्थानिक पातळीवर लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी.

अशा प्रकारे दि. 28 सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करुन माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

(संजय दोंदे)<br>
उपायुक्त (मु.)<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (सु.)
आ.क्र. ....९६६६..
दिनांक ..२०/०९/२४

शि आढव
स्था.प्र.
१९/९/

सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. ९३
दि. २०/९/२०२४

**२८ सप्टेंबर हा दिवस " आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**

**शासन निर्णय क्रमांक -केमाअ २००८/प्र.क्र.३७८/०८/सहा,**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,**
**दिनांक - २० सप्टेंबर, २००८.**

**प्रस्तावना :-**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा देशभरात दिनांक १२/१०/२००५ पासून लागू करण्यात आला आहे. शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच् राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरुपात लोकाभिमुख झाला आहे. महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन स्तरावरुन सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपध्दती, विविध दृकश्राव्य माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देवून व विविध उपक्रम राबवून, त्या जास्तीतजास्त नागरिकांपर्यंत पाहोचविण्याचा शासनाचा मानस आहे. यास्तव प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय प्रसृत करण्यात येत आहे.

निर्णय :-

दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. या दिवशी शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीचा अधिकार या विषयावर आधारित प्रश्नमंजूषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व इ. सारख्या स्पर्धा तसेच चर्चासत्र व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व


कृ.मा.प.

T/.D:Thorat.CR. 378.08.lwp

अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने समाज कार्यकर्त्यांकरिता व इच्छुक गटांकरिता भित्तीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इ. उपक्रम आयोजित करावेत. या उपक्रमांसाठीच्या पारितोषिकांची व्यवस्था स्थानिक पातळीवर लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी. अशा प्रकारे दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करुन माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यास दिनांक २८ सप्टेंबर, २००८ पासून सुरवात करावी. जिल्ह्यात हे उपक्रम व्यापक पातळीवर राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे.

माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास दरवर्षी ऑक्टोबरअखेर सादर करावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in वर संगणक सांकेतांक क्रमांक २००८०९२०१५५३१८००१ वर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( न. म. शिंदे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री /मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

कृ.पु.प.

T/.D:Thorat.CR. 378.08.lwp

सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सर्व विद्यापीठांचे प्रबंधक
सर्व महानगर पालिका आयुक्त
सर्व नगरपालिका मुख्याधिकारी
सर्व मंडळे / शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम
⊠ प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
⊠ प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
⊠ सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
⊠ सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
निवड नस्ती, सा.प्र.वि., कार्यासन क्र. ६.

⊠ पत्राने

T/.D:Thorat.CR. 378.08.lwp